नियमीत फौजदारी खटला क्र. **१६३/२०२४**
निशाणी क्र. **९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **गणेश सदानंद नाईक** |
| वय सुमारे | : | ४९ वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. म्हात्रोळी आदिवासीवाडी, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

मी अशिक्षीत आहे. घटना दि. ०१/१०/२०२४ रोजी झाली. मी मासे पकडण्यासाठी खाडीवर गेलो होतो. एका इसमाने मला माझा मुलगा मनोज नाईक याचा अपघात झाल्याचे सांगितले. सदरचा अपघात हा शहाबाज पेट्रोल पंप येथे झाला होता. एका ट्रकने त्याला धडक दिली होती. अपघातामध्ये माझा मुलगा मयत झाला. मी हॉस्पीटलमध्ये गेलो होतो व मला तेथे घटनेबाबत समजले होते. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. आता मला वाचून दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यास **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. १०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या किंवा माझ्या मुलाच्या नावावर मोटरसायकल नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाकडे मोटरसायकल चालवायचे लायसन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात प्रत्यक्षात

पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या अपघातात कोणाची चूक आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ट्रक चालकाला स्वत: पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ट्रकचालकाच्या चुकीमुळे अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.